# जिल्हाधिकारी कार्यालय वाशिम

## वाळू लिलाव (२५ % रक्कम कमी करुन) सन २०१५-२०१६

### ई टेंडरींग कम ई ऑक्शन (ई- निवीदासह ई - लिलावाची अधिसूचना)

वाशिम जिल्हयातील उपलब्ध वाळू साठयापैकी वाशिम तालुक्यातील ५ व रिसोड तालुक्यातील ४ असे एकुण ०९ वाळू भुखंडाचे लिलाव तालुका निहाय सरकारी किंमतीत २५ % टक्के रक्कम कमी करून तसेच घाट निहाय शासन निर्णय क्र गौखनि १०/०५१२/प्र.क्र.३००/ख दिनांक १२ मार्च २०१३ व शासन निर्णय गौखनि १०/१०१४ प्र.क्र.४९८ ख दिनांक २३ डिसेंबर २०१४ मधील अटी व पर्यावरण विभागाच्या मान्यतेस अधिन राहुन करण्यात येत असून, मा. विभागीय आयुक्त, अमरावती यांनी मंजुर केलेल्या अपसेट प्राईज, तसेच त्यामधील अटी व शर्तीस अधिन राहून दि.३०/०९/२०१६ अखेरच्या मुदतिकरीता जाहिर करण्यात येत आहे.

सदर वाळू लिलावाच्या अटी /शर्ती, अपसेट प्राईज व इतर माहीती जिल्हाधिकारी कार्यालय वाशिम गौण खनिज शाखा तसेच जिल्हयातील सर्व उपविभागीय अधिकारी व तहसिलदार यांचे कार्यालयात व https://eauctioncollwas.abcprocure.com या वेबसाईटवर प्रसिध्द करणेत आलेली आहे.

ई - निवीदा कम ई लिलावासाठी इच्छूक लिलावधारक यांनी ऑनलाईन नोदणी (रजिस्ट्रेशन) करणे आवश्यक आहे. तसेच अधिकृत संस्थेकडून डिजीटल सिग्नेचर (Digital signature) प्राप्त घेतल्याशिवाय ई - निविदा कम ई लिलावामध्ये भाग घेता येणार नाही. याची संबधितांनी नोंद घ्यावी. तसेच इच्छुक वाळू लिलावधारकांना ऑनलाईन नोंदणी करणेसाठी खालील प्रमाणे कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे.

१) ई मेल आय डी
२) रहीवास पुरावा (वाहन चालकाचा परवाना, मतदार ओळखपत्र, बॅंक पासबूक, टेलीफोन /लाईट बिल (स्वत:चे नावावर असलेले ) यापैकी एक )
३) एक कलर फोटो
४) प्रतिज्ञापत्र (वाळू लिलावाच्या अटी /शर्ती, तसेच शासकीय देय सर्व रकमा विहीत कालावधीत भरण्याबाबतची सर्व माहीती मी जाणून घेतली आहे.)
५) पॅन कार्ड
६) टिन नंबर

वरील सर्व कागदपत्राच्या साक्षांकीत प्रती (True Copy) लिलावात भाग घेणा-या व्यक्तींनी जिल्हाधिकारी कार्यालय वाशिम, गौण खनिज शाखा यांचेकडे सादर कराव्यात.

वाळू गटाकरीता भरलेल्या ई निवीदा ही ई ऑक्शनपुर्वी खुली करण्यात येईल. ई निविदेमध्ये नमुद केलेल्याच्या आधारे ई ऑक्शनची सुरूवात रक्कम (Start Price) निश्चित केली जाईल व त्या रकमेपासून ई ऑक्शन सुरू होईल.

ज्या वाळू गटाची हातची किंमत १० लाख पेक्षा जास्त आहे त्याकरीता अर्ज फि रू ५०००/- अधिक प्रोसेसिंग फि रू १५३९/- एकुण रू ६५३९/- नापरतावा भरावे लागेल तसेच ज्या वाळू गटाची हातची किंमत १० लाख पेक्षा कमी आहे. त्याकरीता अर्ज फि रू २०००/- अधिक प्रोसेसिंग फि १५३९/- असे एकुण ३५३९ (नापरतावा) ई पेमेंट जसे :- नेट बॅंकिंग /क्रेडीट कार्ड /डेंबिट कार्ड (एनईएफटि/आरटिजिएस) पध्दतीने भरावी लागेल.

ज्या रेतीघाटासाठी ई निविदा कम ई - लिलाव प्रक्रियेत भाग घ्यावयाचा आहे. अशा व्यक्तींना /संस्थेला अनामत रक्कम अटी व शर्तीचे यथोचित पालनार्थ रक्कम रु. ३,००,०००/- (रुपये तीन लक्ष फक्त) किंवा अपसेट प्राईसच्या २०% यापैकी अधिक असेल तेवढी रक्कम अनामत रक्कम म्हणून अपर जिल्हाधिकारी यांच्या खात्यात ऑनलाईन भरणा करावी लागेल. परंतू ज्यावेळी वाळू घाटाची ऑफसेट किंमत रु. १० लक्षापेक्षा कमी असेल तर ऑफसेट किंमतीच्या २०% रक्कम अनामत रक्कम म्हणुन भरावी लागेल. ही रक्कम लिलावधारकाने ई लिलावाच्या मुदतीत सर्व अटी व शर्तीचे योग्यरित्या पालन केल्यास, ई-लिलावाची मुदत संपल्यावर परत करण्यात येईल. **अटी व शर्तीचे लिलावधारकाने पालन न केल्यास अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.**

**वाशिम जिल्हयातील रेती घाटांच्या फेर (पहीली वेळ) ई - टेंडरींग कम ई - ऑक्शन (ई - निविदासह ई - लिलाव) चे वेळापत्रक**

| दिनांक | तपशिल |
|---|---|
| ३०/०५/२०१६ | सकाळी १०.०० वाजता पासुन बिडर रजिस्ट्रेशन ऑनलाईन पध्दतीने (संगणकीय नोंदणी) सुरू होईल |
| ०५/०६/२०१६ | सायंकाळी ५.०० वाजता ऑनलाईन रजिस्ट्रेशन (संगणकीय नोंदणी) बंद होईल. |
| ०६/०६/२०१६ | सकाळी १०.०० वाजता पासुन ई - निवीदा ऑनलाईन पध्दतीने (संगणकीय) भरणे सुरू होईल. |
| १२/०६/२०१६ | सायंकाळी ५.०० वाजता ई- निवीदा ऑनलाईन पध्दतीने (संगणकीय) भरणे बंद होईल. |
| १३/०६/२०१६ | सकाळी ११.०० वाजेपासुन ई- निवीदा डाउन लोड करून जिल्हाधिकारी कार्यालय वाशिम येथे उघडण्यात येतील. व ई ऑकशन Start Price निश्चीत करण्यात येईल. |
| १४/०६/२०१६ | ई ऑक्शन ई लिलाव खालील प्रमाणे करण्यात येईल.<br>गट (लॉट ) क्रमांक -१ सकाळी १२ ते २ वाजेपर्यंत<br>गट (लॉट ) क्रमांक - २ दुपारी २.३० ते ४.३० वाजेपर्यंत |
| १५/०६/२०१६ | ई ऑक्शन बाबतचा अंतीम निर्णय जाहिर करणे व यशस्वी लिलावधारकाकडून १/४ रक्कम भरून घेणे (स्थळ जिल्हाधिकारी कार्यालय वाशिम ) |

उपरोक्त रेती घाटांच्या ई - टेंडरींग कम ई ऑक्शन (ई- निविदासह ई - लिलाव) प्रक्रिया स्थगीत अगर रद्द करण्याचे, तसेच प्रक्रियेतील कोणत्याही टप्याचा कालावधी वाढविण्याचे अधिकार अपर जिल्हाधिकारी वाशिम यांनी राखून ठेवलेले आहेत.

क्र. खनिकर्म/कावि- /२०१६

वाशिम दिनांक २५/०५/२०१६

स्वा/-

**अपर जिल्हाधिकारी**

**वाशिम**

## वाळू लिलाव सन २०१५-२०१६

## जिल्हा वाशिम

## वाळू भूखंडाच्या ई- निविदा कम ई - लिलावाच्या अटी /शर्ती खालील प्रमाणे आहेत.

१ सन २०१५-२०१६ या वर्षासाठी वाशिम जिल्हयातील वाळू भुखंडाचे सरकारी किंमतीत २५ टक्के रक्कम कमी करुन घेण्यात येत असून सदरचे लिलाव हे दिनांक ३० सप्टेंबर २०१६ पर्यंतच्या कालावधी करीता राहतील.

2 वाळू गटासाठी निश्चित करण्यात आलेल्या अपसेट प्राईस हातची किमंती) पेक्षा अधिक बोलीने "ई" निविदा भरुन लिलावाला सुरुवात करण्यात येईल.

3 "ई" निविदा/ "ई" ऑक्शनद्वारे लिलावात बोलण्यात आलेल्या बोलीच्या रकमा हातच्या किमंतीपेक्षा जास्त नसल्यास विभागीय आयुक्तांच्या निर्देशास अनुसरुन त्या वाळू गटाचा १० दिवसाच्या आत फेरलिलाव करण्यात येईल.

4 "ई" निविदा भरु इच्छिणा-या प्रत्येक व्यक्तीला अनामत रक्कम ही निविदा भरताना ऑनलाईन (Online) पध्दतीने भरावी लागेल. ज्या बोलीदाराची उच्चत्तम "ई" निविदा "ई" ऑक्शननंतर स्विकारण्यात येईल. ज्या बोलीदारांची निविदा स्विकारण्यात येणार नाहीत त्यांच्या अनामत रकमा लिलाव संपल्यानंतर ऑन लाईन पध्दतीने "ई" निविदा भरतांना दिलेल्या बँक खात्यामध्ये परस्पर ऑनलाईन (Online) जमा केली जाईल.

5 "ई" निविदा/ "ई" ऑक्शनद्वारे लिलाव घ्यावयाच्या रेती/वाळू स्थळात अपेक्षित वाळूसाठा आहे किंवा नाही, वाहतूकीसाठी आवश्यक रस्ते उपलब्ध आहेत किंवा नाहीत याची खात्री करुन घेण्याची जबाबदारी संबंधीत लिलावधारकाची राहिल. त्यानंतर याबद्दल कोणत्याही तक्रारीचा विचार केला जाणार नाही.

6 ज्या व्यक्तीचा उच्चत्तम देकार स्विकारण्यात येईल, त्याला लिलावाच्या सर्वोच्च बोलीच्या रकमेच्या १० टक्के रक्कम विक्रीकर विभागास अदा करावी लागेल. तसेच लिलाव रकमेच्या २.२ टक्के टि.सी.एस. आयकर विभागास व रु ५०००/- इतक्या रकमेचा धनादेश उपसंचालक, महाराष्ट्र भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा अमरावती यांचे नांवे काढून तो लिलावाच्या अंतीम मंजूरीपुर्वी जिल्हाधिकारी कार्यालयात जमा करावा लागेल.

7 वाळू गटासाठी निश्चित करण्यात आलेल्या सुरवातीच्या किंमती (Start Price) पेक्षा अधिक बोलीने लिलावाची सूरुवात करण्यात येईल सदरची बोली रु १०००/- रुपयाच्या पटीने वाढवावी लागेल.

8 ज्या लिलावधारकाची बोली /निविदा स्विकारण्यात येईल त्याला त्याने दिलेल्या बोलीच्या रकमेच्या १/४ इतकी रक्कम लिलाव अंतीम केल्यानंतर तात्काळ अपर जिल्हाधिकारी वाशिम यांचे खात्यावर ऑनलाईन जमा करावी लागेल.

9 “ ई ” निविदा / “ ई ” लिलावातील सर्वोच्च बोलीचा देकार स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा निर्णय जिल्हाधिकारी / अपर जिल्हाधिकारी यांचा राहील.

10 “ ई ” निविदा / “ ई ” लिलावातील सर्वोच्च बोली स्वीकारल्यानंतर व 1/4 रक्कम भरल्यानंतर “ ई ” निविदेनुसार उर्वरीत रक्कम भरण्यास तयार असल्याबाबतच्या हमीचे दायीत्व स्वीकारण्याऱ्या दोन व्यक्तीसह लिलावधारक स्वखर्चाने खरेदी केलेल्या रुपये 100/- इतक्या रकमेच्या मुद्रांकीत (स्टॅम्प पेपर) कागदावर त्वरीत करारनामा करुन देईल. असे करारपत्र करुन न दिल्यास त्याने भरलेली 1/4 रक्कम जप्त करण्यात येईल व संबंधीत रेती/वाळू गटाचा फेरलिलाव करण्यात येईल. तसेच विहित कालावधीत वरीलप्रमाणे करारपत्र न केल्याच्या परिणामी लिलावधारकास होणा-या कोणत्याही नुकसानीची जबाबदारी शासनावर राहणार नाही. लिलावाच्या बोलीतील रकमेपैकी वरील अ.क्र. 5 प्रमाणे भरलेली रक्कम वजा जाता शिल्लक राहीलेली 75% रक्कम सर्वोच्च “ ई ” निविदा / “ई” लिलाव स्विकारल्यापासून 15 दिवसात एक रकमी भरावी लागेल. लिलावधारकाने शिल्लक राहीलेली 75 % रक्कम भरल्यानंतर व करारपत्र केल्यानंतर जिल्हाधिकारी यांच्याकडून ताबा देण्याचे आदेश त्वरीत निर्गमित केले जातील. लिलावधारकाने रक्कम भरल्यानंतर व करारपत्र केल्याच्या दिनांकापासून उशीरात उशीरा 7 दिवसाच्या आत तहसिलदार यांच्याकडून लिलावधारकांनी अटी व शर्तीमधील सर्व बाबींची पुर्तता केली असल्याची खात्री केल्यानंतर लिलावधारकास वाळू स्थळाचा ताबा देण्यात येईल.

11 ज्यावेळी रेती/वाळू (ठेका) लिलाव रद्द करण्यात येईल, अशा वेळेस त्या रेती/वाळू क्षेत्राचा नव्याने “ ई ” निविदा/ “ ई ” ऑक्शन पध्दतीने फेरलिलाव करण्यात येईल. फेरलिलावात पूर्वीच्या लिलावाच्या किमंतीपेक्षा कमी किंमत आल्यास फरकाची रक्कम पूर्वीच्या लिलावधारकाकडून जमीन महसूलाची थकबाकी म्हणून वसूल करण्यात येईल. तथापि, फेर लिलावात पूर्वीच्या किंमतीपेक्षा अधिक (जादा) किंमत आल्यास त्यावर पूर्वीच्या लिलावधारकाचा कोणताही हक्क राहणार नाही.

12 लिलावधारक, त्यांच्या लिलाव क्षेत्रातील ज्या ठिकाणातून रेती/वाळू काढण्याने जमीनीची धूप होऊ शकेल व त्यामुळे निवासी इमारतीना, घरे अथवा इतर बांधकामे यांना धोका निर्माण होईल अशा ठिकाणातून वाळूचे स्वत: उत्खनन करणार नाही अथवा इतरांना तसे करण्यास परवानगी देणार नाही. अशा प्रकरणी उत्खनन करण्यास प्रतिबंध करणारे जिल्हाधिकारी / अपर जिल्हाधिकारी यांचे निर्णय अंतिम असतील.

13 विहित केलेल्या मर्यादेच्या पलिकडे असलेल्या क्षेत्रातून रेती/वाळूचे उत्खनन करता येणार नाही. तसेच इतर व्यक्तींच्या खाजगी मालकीच्या जमिनीतून, अशा जमिनी लिलावाने देण्यात आलेल्या क्षेत्रात समाविष्ट असल्या तरी, रेती/वाळू काढता येणार नाही. तसेच रस्ते/पायवाटा म्हणून वापरण्यात येणा-या जमिनीतून रेती/वाळू काढता येणार नाही.

14 जिल्हाधिकारी / अपर जिल्हाधिकारी यांना खाडी पात्रातील नौकननयन मार्गातील अडथळे दूर करणे तसेच जल-जीवन व जल संपत्तीच्या हिताचा दृष्टीने खाडी क्षेत्रातील रेती उत्खननासाठी ड्रेझर्सचा वापर करण्यावर उचित बंधने घालता येतील.

15 कोणत्याही रेल्वेच्या पूलाच्या कोणत्याही बाजूने 600 मिटर्स (2000 फूट) अंतराच्या आत रेतीचे उत्खनन करता येणार नाही. तसेच जेथे नदी- नाल्यांवर पूल आहेत, त्यांच्या स्तंभापासून 100 मीटर्स पर्यंत रेती/वाळूचे उत्खनन करता येणार नाही. कोल्हापूर पध्दतीचे बंधारे व पुरातत्व खात्याने प्रतिबंधित केलेल्या क्षेत्रामध्ये रेती/वाळूचे उत्खनन करता येणार नाही.

16 जेथे वाळू उत्खनन चालू आहे त्या ठिकाणी फलक लावून उत्खनन क्षेत्राची सीमा निश्चित करुन दर्शविणेत यावी.

17 वाळूचे उत्खनन करतेवेळी जर काही प्रमुख खनिज आढळून आल्यास लिलावधारकाने/ठेकेदाराने, विभागीय आयुक्त /जिल्हाधिकारी/अपर जिल्हाधिकारी यांचेकडे सात दिवसात कळविले पाहीजे.

18 वाळूचे/रेतीचे उत्खनन करताना किंवा ती काढताना खाजगी मालमत्तेस कोणतीही हानी/नुकसान पोहचल्यास त्याची भरपाई करण्याचे दायित्व लिलावधारकावर राहिल. अशा हानीची/नुकसानीची परिगणना सक्षम अधिका-याकडून करण्यात येईल व त्या बाबतचा त्याचा निर्णय अंतिम राहिल व अशी रक्कम जमीन महसूलाच्या थकबाकी प्रमाणे संबंधीत लिलावधारकाकडून वसूल करण्यात येईल.

19 लिलावाने दिलेल्या ठेक्याच्या कालावधीत शासनाने तो ठेका रद्द केल्यास किंवा त्याला मंजूर केलेल्या क्षेत्राचे उत्खनन करण्यास किंवा रेती/वाळू काढण्यास बंदी घातल्यास लिलावधारकास शासनावर खटला भरता येणार नाही. परंतू लिलावाची मुदत संपण्यापुर्वी ज्या कालावधीसाठी ठेका रद्द केला जाईल त्या कालावधीसाठी, त्याने ज्या किमंतीला लिलाव घेतला त्या रकमेच्या प्रमाणात त्याला परतावा देण्यात येईल. अशी रककम परत करतांना लिलावाची देकारची रक्कम लिलावातील अंदाजीत वाळूसाठा व प्रत्यक्ष उत्खनन केलेला वाळू साठा विचारात घेवून त्यानुसर परताव्याच्या रकमेची परिगणना करण्यात येईल.

20 उत्खनन केलेल्या किंवा काढलेल्या वाळूची/रेतीची साठवणूक, लिलाव ज्या जिल्हाधिकारी / अपर जिल्हाधिकारी यांनी केला असेल त्याच जिल्हयात करावी लागेल व त्यासाठी अकृषिक परवान्यासह आवश्यक जमीन उपलब्ध करुन घेण्याची जबाबदारी लिलाव धारकाची असेल. सदर वाळू साठविण्यासाठी एकच सलग जागा ठरविता येईल. ते ठिकाण नदीपात्रापासून 200 मीटरपेक्षा अधिक अंतरावर नसावे. सदरच्या क्षेत्रात नदीपात्रातून जाण्यासाठी एकच आणि नदीक्षेत्रातून बाहेर रस्त्यावर पडण्यासाठी एकच मार्ग असेल आणि उर्वरित सर्व क्षेत्र अशाप्रकारे बंद करावे लागेल की ज्यामुळे तेथे एकही वाहन आत किंवा बाहेर जाऊ शकणार नाही. यासाठी लाकडी / तारेचे / लोंखडी / भिंतीचे / दगडाचे कुपंण किंवा मोठमोठी दगडे जी हलविता येणे अशक्य आहे ती ठेवणे किंवा खंदक / चर खोंदणे आवश्यक असेल. वाळू/रेती ठेक्याची मुदत संपण्यापुर्वी ज्या वाळू /रेतीचे उत्खनन केलेले आहे त्या वाळू चा /रेतीचा साठा मुदत संपल्यानंतर 10 दिवसात उत्खननाच्या जागेवरुन हलविण्यात आला नाही तर तो शासनाच्या मालकीचा होईल व अशा वाळूच्या/रेतीच्या किमतीबाबत अथवा मालकीबाबत लिलावधारकास कोणताही हक्क सांगता येणार नाही किंवा त्याबाबत शासनाविरुध्द दावा करता येणार नाही. तसेच लिलावाचा कालावधी संपल्यानंतर तसेच 10 दिवसाची मुदत संपल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत वाळू/ रेती साठा करण्यास परवाना दिला जाणार नाही

21 लिलावधारकास वाळूची / रेतीची वाहतूक करण्यासाठी परवाना दयावयाचा असल्यास त्याने सहकारी संस्था / संस्थाना प्राधान्य दिले पाहीजे.

22 लिलावधारकाने सर्व प्रकारचे कर इत्यादी विहीत केल्याप्रमाणे अदा करावेत.

23 लिलावधारकोने त्याला वाटप केलेल्या /मंजूर केलेल्या क्षेत्राच्या सीमा दर्शविणारे खांब उभारावे.

24 लिलाव घेण्याची तारीख कोणतीही असली तरी लिलावाचा कालावधी 30 सप्टेबर 2016 रोजीच संपुष्टात येईल. लिलावाने दिलेल्या क्षेत्रातून करारात नमूद केलेल्या कालावधीत, परवानगी दिलेल्या साधनाच्या सहाय्याने वाळूचे/रेतीचे उत्खनन करण्याची जबाबदारी लिलावधारकाची राहील. वाळू स्थळात अपेक्षित साठा नाही, रस्ते उपलब्ध नाहीत, वाळू स्थळात पाणी आहे तसेच मानवी वा नैसर्गिक आपतीच्या कारणास्तव सदर कालावधी कोणत्याही परिस्थितीत वाढवून दिला जाणार नाही व वाळू गट बदलून दिला जाणार नाही. लिलावात भरलेली रक्कम परत मिळणार नाही.

25 उत्खनन केलेल्या वाळूच्या/रेतीच्या वाहतूकीसाठी अस्तित्वात असलेले रस्तेच लिलावधारकाने वापरावयाचे आहेत. तसेच वाहतूकीसाठी वेगळे रस्ते उपलब्ध करुन दिले जाणार नाहीत. तसेच वाहतूकीसाठी नवीन रस्ता मिळविण्याची जबाबदारी लिलावधारकाची राहील, रस्ते उपलब्ध नाहीत किंवा वाहतूकीसाठी बंद आहेत या कारणास्तव सदर कालावधी कोणत्याही परिस्थितीत वाढवून दिला जाणार नाही.अथवा रेती/वाळूघाट बदलून दिला जाणार नाही. लिलावात भरलेली रक्कम परत मिळणार नाही.

26 नदीपात्रातून/नाल्यातून अथवा त्याला रेती/वाळू उत्खनन करण्यासाठी ज्या क्षेत्राचे वाटप केले असेल त्या क्षेत्रातून रेती/वाळू उत्खनन करताना नैसर्गिक संपत्तीस व पर्यावरणास धोका होणार नाही याची सर्व खबरदारी लिलावधारकाने घ्यावयाची आहे.

27 रेतीचे/वाळूचे नदीपात्रातून/नाल्यातून भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेने सर्वेक्षणानंतर विहीत केलेल्या खोलीपेक्षा जास्त उत्खनन करण्यात येऊ नये. नदीपात्र/नाला यांचे पात्र बदलून अथवा त्यांना हानी पोहोचवून पर्यावरणाचे नुकसान होणार नाही याचीही खबरदारी लिलावधारकाने घ्यावयाची आहे.

28 लिलावधारकाने गावक-याच्या निस्तार हक्कास बाधा पोहोचविता कामा नये.

29 रेती/वाळू उत्खनन करताना अथवा हलविताना अपघात झाल्यास लिलावधारकाने अपघाताची माहिती तात्काळ जवळच्या पोलीस ठाण्यात द्यावी.

30 महाऑनलाईनने निर्माण केलेली मोबाईल आधारित सुलभ SMATS) ( Sand Mining Approval and Traking system ) प्रणाली राज्यात सन 2014-2015 पासुन अनिवार्य स्वरूपात लागु करण्यात येत असल्याने वाळु /रेती लिलावधारकांना या प्रणालीचा वापर अनिवार्य राहील.

31 (सदर प्रणालीनुसार लिलावधारकास त्याचे 3 मोबाईल नंबर रजिस्टर करणे बंधनकारक राहील. महाऑनलाईनने निर्माण केलेली मोबाईल आधारित सुलभ SMATS) Sand Mining Approval and Tracking System( प्रणालीचा वापर करण्याबाबतच्या मार्गदर्शक सूचना )User Manual) परिशिष्ट ”ब“ येथे देण्यात आल्या आहेत.

32 लिलावधारकाने निर्धारीत वाळु गटातुन वाळूचे उत्खनन करून प्रत्येक वाहनामधील वाळूचे परिमाण, वाहन क्रमांक, वाळु गटाचे नांव /क्रमांक, वाहन कोठून कोठे जाणार आहे, त्या दोन ठिकाणामधील अंतर इत्यादी तपशिल नोदणीकृत मोबाईलवरुन (एसएमएसव्दारे) SMS निर्दिष्ट क्रमांकावर कळविल. प्रणालीकडून लिलावधारकास नोदणीकृत मोबाईलवर त्याने केलेल्या विनंतीनुसार त्यास एसएमएस व्दारे टोकन नंबर प्राप्त झाल्यानंतर त्यास वाळू/रेतीची वाहतुक करता येईल.

33 वाळु रेती वाहतुक करणा-या चालकाकडे उक्त टोकन नंबर नसेल किवा टोकन नंबरचा कालावधी संपलेला असेल तर अशी वाहतूक अवैध ठरेल.

34 वाळु रेतीची वाहतूक करणा-या वाहनचालकाकडे वैध टोकन नंबर आहे किवा नाही , याबाबतचे निरीक्षण संबधित महसूल यंत्रणेकडून तथा नियुक्त भरारी पथकाकडून केले जाईल. अशा निरीक्षणाच्या वेळी संबधित वाहनचालकाकडे वैध टोकन नंबर आढळला नाही किंवा निर्दिष्ट कालावधी संपलेला असेल तर सदर वाळूचे उत्खनन /वाहतूक अवैध समजून त्याविरूध्द जमीन महसूल संहिता 1966 मधील कलम 48 (7) महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन विकास व विनियमन नियम 2013 आणि शासन निर्णय दिनांक 12/03/2013 मधील निर्धारीत तरतुदीनुसार त्यविरूध्द कारवाई करण्यात येईल.

35 वाळू/रेतीलिलावधारकाने नोंदणीकृत मोबाईलवरुन एसएमएसद्वारे प्रणालीस कळविलेल्या परिमाणापेक्षा अधिक परिमाणाची रेती/वाळू वाहून नेत असल्याचे आढळून आल्यास त्या वाहनातील संपूर्ण गौणखनिज अवैध आहे असे समजून त्यावर नियमानूसार दंडात्मक कारवाई तसेच क्षमतेपेक्षा जास्त वाहतूकीबाबत मोटार वाहन कायद्यानुसार कारवाई करण्यात येईल. दंडनिय कारवाई बरोबर जप्त केलेल्या रेतीचा लिलाव करण्यात येईल, त्याचप्रमाणे लिलावधारकाने रेती/वाळूचे केलेले उत्खनन, विक्री व वाहतूक केलेल्या रेती बाबतची दैनंदिनी हिशोब नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. ही नोंदवही व इतर हिशोब कागदपत्रे खनिकर्म अधिकारी, खनिकर्म निरिक्षक, महसूल अधिकारी अव्वल कारकून, मंडळ अधिकारी, तलाठी तसेच जिल्हाधिकारी व भूविज्ञान व खनिकर्म संचालनालयातील निरिक्षण करणा-या अधिका-यासाठी उत्खननाच्या जागेवर उपलब्ध करुन द्यावीत.

36 गौण खनिजाच्या उत्खननाचे, विक्रीचे व वाहतूकीच्या संबधातील सर्व हिशोब व कागदपत्रे , लिलावाने/परवानाने दिलेल्या जागेवर ठेवली पाहीजे आणि सदरहू हिशोब व कागदपत्रे संबधित महसूल अधिकारी, खनिकर्म अधिकारी तसेच भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, महाराष्ट्र राज्य नागपूर यांच्या अधिपत्याखालील अधिका-यांच्या निरिक्षणाकरिता उपलब्ध करुन दयावीत.

37 लिलावधारकाने करारनामा करतेवेळी लिलावाच्या अटी व शर्तीचे यथोचीत पालनार्थ रक्कम रुपये 3,00,000/- (रुपये तीन लाख फक्त) किवा अपसेट प्राईसच्या 20 टक्के यापैकी अधिक असेल तेवढी रक्कम अनामत रक्कम म्हणून अपर जिल्हाधिकारी वाशिम यांच्याकडे ठेवणे आवश्यक आहे. परंतू ज्या वाळू गटाची हातची किंमत रु. 10 लाख पेक्षा कमी असेल तर हातच्या किंमतीच्या 20 टक्के रक्कम अनामत रक्कम म्हणून भरावी लागेल हि रक्कम लिलावधारकाने लिलावाचे मुदतीत सर्व अटी व शर्तीचे योग्यरित्या पालन केल्यास लिलावाची मुदत संपल्यावर परत करण्यात येईल. अटी व शर्तीचे पालन न केल्यास अनामत रक्कम अंशत: अथवा पुर्णत: जप्त करण्यात येईल.

38 लिलावधारकाने नियमात नमूद केल्याप्रमाणे अटी व शर्तीचे तसेच गौण खनिज उत्खनन नियमातील तरतूदीनुसार असलेले नियम (संबधित विभागास लागू असलेले नियम) आणि तसेच महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमातील तरतूदी नुसार तसेच अन्य कायदे / नियमांचे पालन करणे बंधनकारक राहील. त्याचप्रमाणे लिलावधारकाने रेतीचा /वाळूचा पुर्ण उपयोग गौण खनिज म्हणूनच केला पाहीजे.

39 लिलावधारक /परवानाधारक यांना पर्यावरण विषयक व तटीय विनियमन नियमाच्या तरतूदींचे पालन करणे बंधनकारक आहे.

40 कोल्हापूर पध्दतीचे बंधारे किंवा इतर बंधारे / बांध असलेल्या ठिकाणी पाटबंधारे विभाग/ विभागीय आयुक्त/ जिल्हाधिकारी यांनी निश्चित केलेल्या अंतराच्या मर्यादेचे बंधन पाळणे आवश्यक असेल.

41 सार्वजनिक पाणवठा /पाणी पुरवठा व्यवस्था असलेल्या ठिकाणापासून 100 मिटर अथवा भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा निश्चित करेल तेवढया अंतरापलीकडे उत्खनन करणे अवश्यक आहे.

42 वाळूची वाहतूक करतांना वाहनातील वाळू प्लास्टीक पेपरने/ताडपत्रीने आच्छादित करुनच वाळूची वाहतूक करणे बंधनकारक आहे. अशी वाहतूक न केल्यास दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

43 अंदाजित परीमाणापेक्षा अधिक वाळू साठा रेती गटात असल्यास त्यावर लिलावधारकाचा कोणताही अधिकार राहणार नाही व अंदाजित परिमाणापेक्षा अधिक उत्खनन करण्यास लिलावधारकास मुभा राहणार नाही.

44 अवैध वाळू /रेती साठा पकडल्यानंतर महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम 1966 मधील 48(7) व (8) नुसार तसेच इतर लागू होणा-या सर्व कायदे व नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

45 लिलाव मंजूर करणेत आलेल्या वाळू गटांना वाळू उत्खननाकरिता सक्शन पंपाचा वापर करावा लागेल अशा वाळू गटांना महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण महामंडळ, भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेची व शासनाची परवानगी मिळाल्यानंतर रितसर परवानगी देणेत येईल.

46 लिलावधारकाने वाळु/रेतीची वाहतूक /विक्री करतांना त्याची शासकीय नमुन्यातील पावती देणे आवश्यक आहे. वाहतूकी दरम्यान सदरची पावती चालका जवळ असणे आवश्यक आहे. सदर पावतीवर SMATS प्रणालीमार्फत प्राप्त झालेला विनिर्दीष्ट टोकन क्रमांक टाकणे बंधनकारक राहील. वाहन चालकाजवळ वर नमुद केलेली पावती नसल्यास किवा त्यावर SMATS प्रणाली टोकन क्रमांक नसल्यास सदरची वाहतुक अवैध धरून प्रचलित कायद्यानूसार दंडात्मक कारवाई करण्यात येईल. प्रत्येक पावतीवर जिल्हा खनिकर्म अधिकारी यांची सही शिक्का असणे आवश्यक राहील.

**47** लिलावधारकाने त्याच्या लिलाव स्थळातील वाळूची वाहतूक करणा-या वाहनास तो वाहून नेईल इतक्या परिमाणाची व सलग क्रमांकाची वाहतूक पावती द्यावी. एखादे वाहन तपासणी मध्ये पावतीसह आढळून आले, परंतू सदर पावतीवर SMATS टोकन क्रमांक न आढळून आल्यास, अशा प्रकारचे गौण खनिज अवैध व शासकीय मालमत्तेची चोरी समजण्यात येईल. व याबाबत लिलावधारकावर दंडात्मक कारवाई करण्यात येईल. कोणतेही वाहन वहन क्षमतेपेक्षा अधिक अधिक परिमाणाची वाळू वाहून नेत असल्याचे आढळून आल्यास त्या वाहनातील संपूर्ण गौण खनिज अवैध आहे असे समजून त्यावर नियमानूसार दंडात्मक कारवाई बरोबर जप्त केलेल्या वाळूचा लिलाव करण्यात येईल. तसेच सदर वाहनावर मोटार कायद्यानुसार व अन्य कायद्यानुसार कारवाई करण्यात येईल.

**48** पावतीमध्ये नोंदी घेतांना, कार्बन पेपरचा वापर करणे अनिवार्य आहे. म्हणजेच पावतीची पहीली प्रत बॉल पेनने लिहावी व त्या खालील प्रतीच्या वर कार्बन टाकून नोद घेण्यात याव्यात. तसेच पहील्या प्रतीच्या मागच्या बाजूवर देखील कार्बन उमटेल अशा प्रकारे कार्बन वापरावा. म्हणजेच पहील्या पावतीच्या मागे आणी दुस-या पावतीच्या समोरील बाजूवर केवळ कार्बनच्या नोदी राहतील. पेनच्या नोदी असणार नाहीत.

**49** वाळू उत्खननाचा व पावती पुस्तकाचा हिशोब वेळेच्या वेळी न देणे, आपल्या स्थळ प्रतीमध्ये आणी वाहतुक करणा-या वाहन चालकाच्या प्रतीध्ये तफावत असणे ई बाबी सुध्दा शर्तभंग समजण्यात यंईल. अशा बाबी निदर्शनास आल्यास, संबधित ठेकेदाराचा ठेका रद्द करण्यात येईल.

**50** वाळू स्थळामधून वाळू उत्खनन केल्यानंतर, शिल्लक राहीलेले खडवाण अथवा जाड वाळू नदीपात्रामध्ये सपाट करण्याची जबाबदारी संबधित लिलावधाकाची राहील.

**51** लिलावधारकाने लिलावातील अटी व शर्तीचा तसेच SMATS प्रणालीचा भंग करून वाहतूक केल्यास त्यावर कलम ४८ (७) (८) प्रमाणे व गौण खनिज नियम २०१३ नुसार दंडात्मक कार्यवाही केली जाईल. तीन वेळा पेक्षा जास्त वेळा अशा प्रकारे दंडात्मक कार्यवाही झाली असल्यास लिलावधारकाने जमा केलेली अनामत रक्कम पुढील प्रमाणे जप्त करण्यात येईल.

१) चवथ्या वेळेस होणारा भंग- अनामत रकमेतून २५ टक्के रक्कम जप्त केली जाईल.
२) पाचव्या वेळेस होणारा भंग - अनामत रकमेतून ५० टक्के रक्कम जप्त केली जाईल.
३) पाच वेळा पेक्षा जास्त वेळा भंग - संपूर्ण अनामत रक्कम जप्त केली जाईल.

वरील प्रमाणे अनामत रक्कम जप्त केल्यानंतर सदरची रक्कम तात्काळ भरावी लागेल रक्कम भरे पर्यंत वाहतूक करता येणार नाही. अनामत रक्कम जप्त करावयाची सदरची कारवाई ही दंडात्मक कारवाई व्यतीरीक्त असेल.

52 “ई” निविदा, “ई” ऑक्शनमध्ये भाग घेणा-या सर्व व्यक्ती /संस्थेस पर्यावरण विभागाचे सर्व नियम बंधनकारक राहतील.पर्यावरण विषयक नियमांचा भंग झाल्यास त्याबाबत दंडात्मक कारवाईस पात्र राहील.

53 लिलावधारकांने निवीदा अधिसूचना, सर्वसाधारण निर्देश, विशेष निर्देश यातील अटी,शर्ती पालन केल्यानंतर लिलावधारकाशी विहीत करारनामा करुन घेतल्या नंतर पात्र लिलावधारकास वाळू गटाचा ताबा देण्यात येईल.

54 दिलेल्या ठेक्याचे व उत्खनन परवान्याचे कोणतेही कारण न देता निलंबन करणे, रद्द करणे अथवा माघार घेण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना असतील.

55 मा. राष्ट्रीय हरीत न्यायाधिकरण पुणे समोरील अर्ज क्र ४४/२०१४ परमजित कलसी वि वन व पर्यावरण मंत्रालय व इतर या प्रकरणातील अंतीम आदेशाला अधिन राहुन लिलाव करण्यात येत आहे. हया प्रकरणातील अंतीम आदेश लिलावधारकास बंधककारक राहील.

56 शासन वेळोवेळी जे निर्देश देईल त्याचे पालन करणे बंधनकारक असेल.

57 वरील पैकी कोणत्याही अटी शर्तीचा भंग केल्यास सर्व अनामत रक्कम तसेच लिलावधारकाने शासनास अदा केलेली सर्व रक्कम जप्त करुन लिलाव रद्द करण्यात येईल आणि इतरही कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्वा/-

**अपर जिल्हाधिकारी,**

**वाशिम**

रेतीघाट ई टेंडरधारकाने स्वखर्चाने विकत घेतलेल्या रुपये १००/- चे मुद्राकीत स्टँप पेपरवर दोन साक्षीदारांचे स्वाक्षरीसह द्यावयाचा करारनामा

# करारपत्र/प्रतिज्ञापत्र

(Afreement to be sworn before Ex. Magistrate / Tahsildar)

मी नामे (पुर्ण नाव) :-

राहणार ( पोस्टाचा पुर्ण पत्ता द्यावा) :-

तालुका, जिल्हा :-

माझे/ माझ्या संस्थेचे पॅन क्रमांक :-

टिन क्रमांक :-

मी स्वत: प्रतिज्ञापुर्वक घोषित करतो की, मी रेती घाटाच्या ई - निविदेतील, ई - ऑक्शनमधील सर्व अटी व शर्तीची जाणीव करुन घेतली आहे व मी प्रस्तावित केलेल्या किंमतीत रेतीघाट घेण्यास इच्छुक असून त्यांची २५ टक्के रक्कम मी शासन जमा करीत आहे. मला सदर रेतीघाट मंजूर झाल्यास उर्वरित संपुर्ण ७५ टक्के रक्कम मी १५ दिवसांचे आत चलानद्वारे भरणा करुन मंजूर रेतीघाटाचे निष्पादन करुन घेण्याची हमी देत आहे. तसे न केल्यास मी जमा केलेली २५ टक्के रक्कम शासन जमा करण्यात यावी व नियमानुसार दुसऱ्या निविदाधारकास रेतीघाट मंजूर केल्यास अथवा फेरनिविदाद्वारे विल्हेवाट केल्यास तसेच शासनास झालेले नुकसान जमीन महसूलाची थकबाकी म्हणुन वसुल केल्यास माझी काहीच उजर राहणार नाही याची मला जाणीव आहे.

१. मी असेही घोषित करतो की, सदर्हु रेतीघाट आणि अनुमोदित पोच रस्त्याची मी पाहणी केली आहे. त्याच्या परिस्थितीबाबत अथवा रेती वाहतुकीसाठी योग्यतेबाबत मी इतर कोणताही आक्षेप उपस्थित करुन वाद निर्माण करणार नाही.

२. महाऑनलाईनने निर्माण केलेली मोबाईल आधारीत सुलभ SMATS (Sand Mining Approval & Tracking System) प्रणालीचा या वर्षापासुन वापर करण्याकरीता ३ तीन नोंदणीकृत मोबाईल क्रमांक आपणांस उपलब्ध करुन देईल व सदर प्रणालीचा वापर करण्यास बंधनकारक राहील.

३. ज्यास रेती विक्री करण्यात येईल त्या व्यक्तीस वाहतुक परवाना पावती व SMATS प्रणाली कडुन अधिकृत टोकन प्राप्त करुन घेतल्यानंतरच वाळु / रेती देण्यात येईल.

४. मी असेही घोषित करतो की, माझे नाव रेतीघाट प्रक्रियेबाबत किंवा रेती ठेका चालविण्याबाबत काळ्या यादीत नाही, तसे निदर्शनास आल्यास मी फौजदारी कार्यवाही पात्र राहीन.

५. तद्वतच रेती उत्खनन/वाहतुक केल्याबाबतचे मासिक अहवाल नियमितपणे व विहित वेळेत तहसिल कार्यालय व जिल्हाधिकारी (खनिकर्म शाखा) येथे सादर करण्यास बंधनकारक राहीन.

ठिकाण

दिनांक ( )

रेतीघाट घेणाऱ्याचे नाव व स्वाक्षरी

**<u>दायित्व स्वाकारणारे दोन व्यक्ती</u>**

१. पुर्ण नाव/पत्ता व स्वाक्षरी :-

२. पुर्ण नाव/पत्ता व स्वाक्षरी :-